ललिता गंडभीर
Lalita Gandbhir.
4200 North Ocean Drive.
1501-2
Riviera Beach, FL. 33504.
U. S. A.

# बालमानसशास्त्राचे ज्ञान

सात वर्षाच्या निखिलला त्याच्या मित्राने रात्रभर आपल्या वाढदिवसाच्या पार्टीला म्हणून रहायला बोलावले होते. निखिल आतापर्यंत एकटा रात्रभर घर व आई-वडील सोडून कधीच राहिला नव्हता. म्हणून मनातून त्याला भीतीही वाटत होती. तरीही पार्टी त्याला चुकवायची नव्हती. म्हणून तो पार्टीला आला होता. खरे म्हटले तर सात वर्षाची मुले या प्रकारच्या पार्टीला थोडी लहानच होती. पण निखिलच्या मित्राने, सॅमने हट्टच केला होता म्हणून सॅमची आई अशी पार्टी करायला तयार झाली होती.

संध्याकाळी सहा वाजता सगळी आमंत्रित मुले स्लीपिंग बॅग्ज्,नाईट ड्रेस,प्रेझेंट इत्यादी सामानासह उगवली. सॅमचा मोठा भाऊ जॉन पण पार्टीला आला होता. तो वरच्या मजल्यावर होता. त्याच्याही वयाचे कोणी असावे या हेतूने सॅमच्या आईने मॅक्स ह्या त्याच्या मित्रालाही बोलावले होते. थोडक्यात या सात वर्ष्यांच्या मुलात दोन दहा वर्षांचे मुलगे पण पार्टीला होते.

जेवण,केक,प्रेझेंट उघडणे इत्यादी झाल्यावर सॅमच्या आईने सर्व मुलांना स्लीपिंग बॅग पहिल्या मजल्यावरच्या मोठ्या खोलीत घालायला मदत केली. कारण सॅम व त्याचे मित्र पहिल्या मजल्यावर झोपणार होते. जॉनची आणि त्याच्या मित्राची रवानगी झोपायला दुसऱ्या मजल्यावर जॉनच्या खोलीत झाली. बारा वाजेपर्यंत सर्व मुलांनी दंगा केला आणि शेवटी सगळी एकेक करून झोपले.

रात्री पूर्ण अंधारात निखिलला कुणी चिमटा काढला. त्यामुळे तो जागा झाला तर काय खोलीत दोन पांढऱ्या आकृत्या फिरत होत्या. आकृत्यांना खाली धड होते. वरती पांढरे डोके होते. आणि डोक्यात तोंड असते तिथून लाल प्रकाश येत होता. त्या आकृत्या मध्येच जाड तर मध्येच बारीक होत होत्या. सर्वांच्या अंगावर पाय देत त्यांचे तांडव नृत्य चालले होते. निखिल घाबरून थरथरू लागला. एक दोनदा आकृत्या बाजूला गेल्यावर त्याने खोलीत चोरटा दृष्टीक्षेप टाकला. इतर काही मुले उठून बसली होती. त्यांचे चेहरे दिसत नव्हते. एकदम एका मुलाने मोठ्ठा गळा काढला. त्याबरोबर निखिलचीही दातखीळ उचकली. त्यानेही भोकाड पसरले. मग एकदम सगळी मुले किंचाळून ओरडू लागली. दोन्ही आकृत्या एकदम खोलीबाहेर जाऊन नाहीशा झाल्या.

एवढ्यात कोणीतरी दिवा लावला. खोली प्रकाशाने उजळून निघाली. सॅमची आई व वडील गाऊन लपेटून दिव्याच्या बटणाजवळ उभे होते. सॅम धावत जाऊन आईला बिलगला. ‘काय झालं?’ ‘काय झालं?’ ‘किंचाळत रडलात कशाला?’ सॅमचे आई व वडील मुलांना विचारू लागले. हळूहळू रडण्याचा आवाज थांबला. तिनदा आईने विचारल्यावर सॅमची वाचा परत आली.

‘भू...भू...भूत’ तो थरथरत म्हणाला. भुताचे नाव काढताच दोन मुलांनी परत गळे काढले. सॅमच्या आईवडिलांनी एकमेकांकडे आश्र्चर्याने पहिले. मग मुलांना त्यांनी प्रश्न विचारून माहिती काढली.

‘दो...दोन...दोन भुते’ ‘पांढरी’ “लालप्रकाश” तोंडातून इत्यादी वर्णनावरून सॅमच्या आईवडिलांच्या डोक्यात एकदम प्रकाश पडला. ते वर जॉनच्या खोलीत गेले आणि त्यांनी चुरगळलेल्या जमिनीवरच्या चादरी,दोन लाल कागद लावलेले छोटे फ्लॅश लाईट्स(बॅटरी) आणि दोन अस्ताव्यस्त केसांची भूते पकडून खाली आणली. त्यांनी जॉनला आणि त्याच्या मित्राला चांगला दम भरला. मग सॅमच्या आईने त्यांच्यावर परत चादरी घालून त्यांना भूत बनवून नाचवून दाखवले. हळूहळू मुलांची भीती गेली. मुलांच्या रडण्याचे रुपांतर हसण्यात झाले. भुते परत आपल्या खोलीत झोपायला गेली. सॅमची आई मग सोफ्यावर मुलांच्या खोलीतच झोपली. सकाळी ब्रेकफास्ट करून निखिल घरी परतला.

आणि त्या दिवसापासून त्याची भुताची भीती सुरु झाली. निखिलचे आईवडील मनिषा आणि विजय किंवा त्याची चौदा वर्षाची बहीण स्वाती यांच्यापैकी कुणी त्याच्याबरोबर असल्याशिवाय तो घरातल्या कोणत्याही खोलीत एकटा राहीचना. त्यांचे घर दोन मजली होते. पहिल्या मजल्यावर बेडरूम्स. स्वाती व निखिलच्या स्वतंत्र खोल्या होत्या. मनिषा व विजय आतापर्यंत मुलांना त्यांच्या खोलीत झोपवत. रात्री मनिषा व विजयच्या खोलीचे दार सताड उघडे असे. मुलांना काही कारणाने जरुरी वाटली तर आईवडिलांकडे येऊन झोपायची संपूर्ण मुभा होती. पण आतापर्यंत मुले आलीच नव्हती. ती रात्री झोपली की सकाळी उठायची. पण निखिल त्या पार्टीला जाऊन आल्यावर एकदम बदलला. तो कोणीतरी खोलीत असल्याशिवाय झोपायला कबूलच व्हायचा नाही. रात्री दोनतीनदा भूत भूत म्हणत उठायचा. सगळी माणसे पहिल्या मजल्यावर असली व त्याला दुसऱ्या मजल्यावरून काही पाहिजे असले तर कुणाला तरी वरती आले पाहिजे म्हणून हट्ट करायचा.

मनिषा आणि विजयला वाटले की थोड्या दिवसांनी त्याची ही भीती जाईल. तो पूर्वीसारखा वागू लागेल. तसे थोड्या प्रमाणात झालेही. दिवसा निखिल एकटा वरच्या किंवा खालच्या

मजल्यावर राहू लागला. पण त्याची रात्री एकटे झोपण्याची भीती मात्र जाईना. रात्री तो एकदा दोनदा किंचाळत उठायचा. त्यामुळे सर्वांची झोपमोड व्हायची. स्वाती 'शट्अप् शट्अप्' म्हणून ओरडायची. 'भीती वाटली तर तू मुकाट्याने माझ्या खोलीत येऊन झोप' असेही मनिषाने निखिलला सांगून पहिले. पण त्याचे किंचाळणे थांबेना. असे सहा महिने झाल्यावर विजय आणि मनिषा हताश झाले. त्यांनी डॉक्टरकडून झोपायच्या गोळ्या आणून मधून मधून निखिलला द्यायला सुरवात केली. कारण सगळे झोप नसल्याने चिडचिडल्यासारखे होऊन रात्री दमून जायचे. झोपेच्या गोळ्या रोज निखिलला देणे मनिषाला पसंत नव्हते. त्याला सवय लागेल अशी तिला भीती वाटत रहायची. डॉक्टरने 'निखिलला मुलांच्या मानसशास्त्रज्ञाकडे नेऊन पहा' अशीही सूचना केली. त्याच्या भीतीच्या मूळ कारणाचा शोध लावला पाहिजे,असे तो म्हणाला.

त्याला मानसशास्त्रज्ञाकडे नेण्याआधी मनिषाने निखिलबरोबर भूतांविषयी खूप चर्चा केली. भुते नसतात हे त्याला पटवून द्यायचा प्रयत्न केला. निखिलने ते वरवर पटल्यासारखं दाखवलेही. पण त्याचे रात्री अपरात्री किंचाळणे आणि उठणे काही थांबेना.

एवढ्यात कंपनीच्या कामासाठी विजयला सहा महिन्यांसाठी परदेशात फिरतीवर जावे लागणार आहे असे कळले. त्यामुळे मोठी समस्या निर्माण झाली.

मनिषा एका दुकानात सुपरवायझरचे काम करीत असे. तिथे रात्री उशिरापर्यंत दुकान उघडे असल्याने तिला दुपारी २ ते रात्री ३ वाजेपर्यंत दुकानात राहावे लागत असे. विजय असताना फारसा प्रश्न नव्हता. आता विजय जाणार म्हणून मनिषाने रात्री ८ ते ३ वाजेपर्यंत कामावर जायचे ठरवले. ती साडेसातला निखिलला झोपवून जाणार होती. निखिल पूर्वीसारखा शांत झोपत असता तर ते सगळे व्यवस्थित जमले असते. कारण स्वाती घरातच होती. स्वाती पुष्कळदा शेजारी बेबीसिटींग करीत असे. त्यामुळे तिला एकटे रहायची सवयही होती.

परंतु आता निखिलच्या या एकटे न राहण्याच्या प्रकरणामुळे मोठी समस्या उभी राहिली.

'मी त्याला झोप लागेपर्यंत तासभर त्याच्या खोलीत बसून राहिले, तर माझा अभ्यास कसा होईल?' स्वातीने तक्रार केली. 'आणि तो रात्री उठून आला तर मी काय करू? त्याच्या खोलीत मी झोपू? माझ्या झोपेची वाट लागेल.' तिने दुसरा मुद्दा काढला.

मनिषाला पण काय करावे कळत नव्हते. तिलाही स्वातीकडे निखिलला ठेवून जायची मुळीच इच्छा नव्हती. कारण दोघांत चांगला सात वर्षाचा फरक असला तरी त्यांची जोरदार भांडणे होत असत. शिवाय सात वर्षाच्या घाबरलेल्या मुलाला स्वातीने न रागवता झोपवले नसते. तिला

चाइल्ड सायकॉलॉजीचे अजिबात ज्ञान नव्हते,असे मनिषाचे प्रामाणिक मत होते. निखिलशी हळुवार वागायच्याऐवजी ती त्याच्या अंगावर कचाकच ओरडत असे.

'स्वाती लहान मुलांशी त्याच्या कलाने घ्यावे. त्यांना सांभाळून घेतले पाहिजे. निखिलशी कसे वागायचे हे तुला मुळीच समजत नाही.' असे मनिषा स्वातीला नेहमी म्हणायची. ह्या स्वातीच्या वागण्यामुळे निखिलला तिच्यावर सोपवून जाणे मनिषाला मुळीच पसंत नव्हते. ह्या सर्व त्रांगड्यातून मार्ग काढण्यासाठी तिने निखिलसाठी बालमानसशास्त्रज्ञाचीही अपॉइंटमेंट घेतली.

विजयने जाण्यापूर्वी 'नोकरी सोडून दे, निदान सुपरवायझरचे काम सोडून दे म्हणजे तुला रात्री काम करावे लागणार नाही' असे मनिषाला संगितले. पण नुकतीच अतिश्रमाने मिळवलेली बढती आणि त्याबरोबर पगारवाढ नाकारायची मनिषाची मनाची तयारी नव्हती.

विजय गेल्यावर साडेसात वाजता जायच्या पहिल्या दिवशी मनिषा निखिलला झोपवून कामाला जायला निघाली. निखिल जागाच होता. स्वातीला तिने 'त्याला झोप लागेपर्यंत त्याच्या खोलीत बस. त्याच्या अंगावर काही झाले तरी ओरडू नकोस' इत्यादी सूचना अनेक वेळा दिल्या.

स्वाती खुशाल होती. 'मी बघून घेते. तू जा' म्हणून तिने मनिषाला आश्वासन दिले.

कामावर पोहोचली तरी मनिषाला चैन पडेना. म्हणून ती  अखेरशेवटी अकरा वाजताच काही निमित्त सांगून आपले काम दुसऱ्यावर सोपवून घरी परत आली.

मनिषा परत आली तेव्हा स्वाती स्वतःच्या खोलीत झोपायच्या तयारीत होती. 'लवकर कशाला आलीस?' तिने आपल्या आईला विचारले. 'निखिलची काळजी वाटत होती ना? काही काळजी करायची जरुरी नाही. तो आरामात झोपलाय. तू आता त्याच्या खोलीत जाऊ नकोस' असे आईला सांगून स्वाती झोपून गेली.

मनिषा सकाळी जागी झाली तेव्हा निखिल रात्रभर उठला नाही हे तिच्या लक्षात आले. पूर्ण रात्र शांत झोप मिळाल्याने तिला ताजेतवाने वाटत होते. गाणे गुणगुणत ती खाली आली आणि चहा पिऊन निखिलला शाळेला जायला उठवावे असा विचार करत तिने पाणी उकळत ठेवले. तेवढ्यात निखिलच दात घासून खाली आला. आईने दिलेला टोस्ट खात तो विचारू लागला.

‘आई, गणपती जिवंत आहे का?’ ‘सगळे देव जिवंत आहेत का नाहीत हे माणसाच्या मानण्यावर असते’ असे काही तत्वज्ञानी उत्तर मनिषाच्या जिभेवर आले होते, पण तिने निखिलच्या वयाचा विचार करून ते परतवले.

‘आहे ना! का विचारतोस रे?’ तिने निखिलला विचारले.

‘मम्मी काल रात्री शंकर आणि गणपती बाप्पा माझे रक्षण करीत होते म्हणून मला भुते दिसली नाहीत. ‘निखिलने स्वतः न उठल्याचे कारण दिले. ‘काय?’ मनिषा किंचाळली. ‘आता ह्याच्या डोक्यात भुतांबरोबर दुसरेही काही आले की काय?’ अशी भीती तिच्या मनात निर्माण झाली.

‘स्वातीने गणपतीबाप्पा आणि शंकरबाप्पा देव्हाऱ्यातले उचलून माझ्या पलंगाच्या उशाजवळ ठेवले. आणि स्वातीचा बिबटा वाघ आहे ना तो दरवाज्याकडे ठेवला. आजोबांनी इंडियातून हत्ती पाठवला तो एका खिडकीत आणि तिचा तो साप दुसऱ्या खिडकीत ठेवला. आणि म्हणाली तुला घाबरायचे कारण नाही. देव तुझे रक्षण करतोय. आणि हे सगळे प्राणी खिडक्या दारावर पहारा करतायत. भुतांना ते मुळीच आत येऊ देणार नाहीत. भुते देवांना घाबरतात. तेव्हा माझी भीती गेली.’

मनिषा धावत निखिलच्या खोलीत गेली, स्वातीने सगळे प्राणी, तिची स्टफ्ड ॲनिमलस बाहेर बघत बसल्यासारखे दरवाजा खिडक्यात मांडले होते. शंकर आणि गणपती उशीजवळच झोपलेल्या निखिलकडे तोंड करून बसवल्याप्रमाणे बसले होते. एवढ्यात स्वाती डोळे चोळत चोळत उठून खाली आली आणि निखिलशी ‘तू माझे पेन काल घेतलेस’ म्हणून भांडू लागली. आश्चर्याचा आणि आनंदाचा धक्का बसलेली मनिषा परत खाली किचनमध्ये आली. तोपर्यंत निखिल आणि स्वातीची पेनवरून मारामारी चालू झाली होती. निखिलच्या हातात पेन होते.

‘मला का हे सुचले नाही?’ मनिषा विचार करू लागली.

‘स्वाती तू मला निखिलची भीती घालवायचा हा उपाय आधी का सुचविला नाहीस?’ मनिषाने स्वातीला तिचे आणि निखिलचे भांडण थांबवत विचारले.

‘कारण मलाही तू गेल्यावरच सुचले काल. तोपर्यंत त्याविषयी मी विचार केला नव्हता.’ स्वातीने उत्तर दिले.

‘हो का?’ मनिषा म्हणाली, ‘अगदी अंगाशीच आल्यावर विचार करतेस तू स्वाती! आणि मला का हे सुचले नाही?’

‘तुला खरी चाइल्ड सायकालॉजी कुठे समजते?’ स्वातीने नाक उडवत उत्तर दिले आणि ती निखिलच्या हातातले पेन खेचून घेऊन पळून गेली.

पूर्व प्रसिद्धी: वसंत,डिसेंबर १९८७